

BVBK-0402905



# फुलाबाई

यदुनाथ थत्ते



"ऑपरेशन ब्लॅक बोर्ड योजनेखालील पुस्तक - १९९२-९३"

# फुलाबाई

[illegible], [illegible]
[illegible] [illegible] विभाग
[illegible] २९०५ दिनांक १०।१।९४
[illegible] बा.वा. ...... [illegible] ..........

यदुनाथ थत्ते

BVBK-0402905

चेतश्री प्रकाशन

चेतश्री प्रकाशन, अंमळनेर

: प्रकाशक :
सौ. यशोदा सोनार
चेतश्री प्रकाशन
'मुक्ताई', धुळे रोड
अमळनेर ४२५४०१

: मुद्रक :
श्री. सुनिल अंबिके
श्री. समर्थ साई मुद्रण
४२६, सोमवार पेठ,
बरके आळी, पुणे ४११ ००१

© यदुनाथ थत्ते

: प्रथमावृत्ती :
२६ जानेवारी १९८९

मूल्य : रु. दहा फक्त

बं. बं. ..., ...
2204 ... 90.4.18
आ. वा.

# फुलाबाई

खानदेशातले जळगाव जितके प्रसिद्ध आहे, त्याच्यापेक्षा जळगावलगतचे मेहरूण जास्त प्रसिद्ध आहे.

मेहरूण प्रसिद्ध आहे, तिथल्या बोरांमुळे. मेहरूणची बोरे म्हटली की, लोकांच्या तोंडाला पाणी सुटते. त्या बोरांची मिठ्ठास लोकांच्या जिभेवर कितीतरी काळ रेंगाळत राहाते !

जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात जळगांवचा भाजी बाजार मेहरूणच्या बोरांच्या वासाने नुसता घमघमत असतो.

जळगावहून बाहेर जाणारा प्रत्येक प्रवासी बोरांची डालकी हटकून बरोबर नेतो. त्यामुळे रेल्वेच्या डब्यात आणि बसमध्येही बोरांचा वास दरवळत असतो.

त्या घमघमाटाने माणसातला संकोच नाहीसा होतो. सहजपणे उतारूंत बोरांची देवाण-घेवाण होते. आल्या पाहुण्यांचे स्वागतही बोरांची कटोरी पुढे ठेवूनच होते.

तसे पाहिले तर बोर हे पोराटोरांचे खाद्य. त्यांचा तो मेवा. त्यावर ते तुटून पडतात. मोठी माणसे माकड मेवा म्हणून त्याची चेष्टा करतात. ते काही प्रतिष्ठित फळ कोणी मानत नाही.

गावातील बोरे बहुधा गोल असतात. लहानखुरी, मगज कमी आणि साल जाडसर असणारी. चनिया-मनिया बोरे म्हणून विकली जाणारी ती बोरे. पण मेहरूणचे बोर त्या जातीचे नव्हे. तपकिरी मखमली सालीचे, भरपूर मगज असणारे हे बोर. त्याच्यात कीड म्हणून सापडायची नाही ! इतर मोठ्या बोरांत कीड हटकून आढळते. त्यामुळे

प्रत्येक बोर नीट पाहून तोंडात घालावे लागते. पण मेहरूणचे बोर डोळे मिटून खावे !

मेहरूण हे जळगावलगतचे गाव. एका तलावाच्या काठी वसलेले. बोराची झाडे तिथे पुष्कळ. बोराच्या हंगामात तिथे बोरे वेचणारांची नुसती झुंबड उडते. रोज शेकडो पाटया भरभरून बोरे बाजारात जातात.

आया-बाया बोरांच्या पाटया घेऊन जळगावच्या बाजाराकडे निघतात. ठेक्यात त्यांची पावले पडतात. तोंडाने त्या काहीबाही गाणी गुणगुणत असतात –

मेहरूणची बोरं अमुची
मेहरूणची बोरं
खाती पोरंटोरं मजेनं
खाती पोरंटोरं ।

पोराटोरांचं नाव घेती
पोराटोरांच नाव
आपला साधती डाव मोठे
आपला साधती डाव ।

फुलाबाईची देन मोठी
फुलाबाईची देन
अजब बनली दुनियामधे
अजब तिची देन ।

बोरी कसली बोरी बाई
बोरी कसली बोरी
फुलाबाईची प्यारी छोरी
फुलाबाईची छोरी ।

बोरं मेहरूणवाली बाई
बोरं मेहरूणवाली

बोरांच्या गोडीनं सारी
दुनिया वेडावली ।

चला सयांनो चला झपाझपा
चला सयांनो झपाझपा
वाजारी जळगावच्या चला ग
पाय वाजू द्या टपाटपा ।

वाया झपाझपा चालायच्या, पण वारा बोरांचा वास आधीच पुढे घेऊन जायचा. लोक त्या वासानं छाती भरून घ्यायचे.

मेहरूणची बोरे ती मेहरूणची बोरे. त्यांची सर ना अमदावादी बोरांना, ना वाणेरच्या बोरांना, ना अलहावादी बोरांना ना बनारसी बोरांना.

इंकडे बोरांचा वास घमघमू लागला की, मेहरूणच्या जत्रेचे वेध सगळ्यांना लागतात.

पंचक्रोशीत अशी मोठी जत्रा दुसरीकडं भरत नाही.

जत्रेच्या दिवसापर्यंत कोणी जाणता माणूस बोराला तोंड लावत नाही! पोरासोरांनाही लपून छपून बोरे खावी लागतात आणि घरात शिरताना तोंड धुवून, वास येणार नाही असा बंदोवस्त करून उंबऱ्याच्या आत पाऊल टाकावे लागते.

एखाद्या पोरापोरीच्या तोंडाला तरीही वास येई आणि मग घरातले वडीलधारे त्यांच्यावर खेकसत !

गावात प्रथा अशी आहे की, फुलाबाईच्या समाधीला वाहाण्यासाठी पहिल्यांदा बोरे तोडायची. फुलाबाईच्या समाधीपुढे बोरे ठेवली की, पंचक्रोशीत त्याचा बानवळा जायचा आणि त्यानंतर बाजाराकडे पाट्या जावू लागायच्या.

लोक फुलाबाईच्या गोष्टी सांगायचे.

फुलाबाई मेहरूणला आली ती गावची सून म्हणून. ठाणसिंगभाऊंची बायको म्हणून.

दोघांचा जोडा कसा लक्ष्मीनारायणासारखा दिसायचा! गावचे लोक मनातल्या मनात त्यांच्यावरून लिंबलोण ओवाळून टाकायचे. आयाबाया कानांपाशी बोटे मोडून म्हणायच्या, 'इडापिडा टळो–अन् अमंगळ पळो!'

ठाणसिंगभाऊला स्वतःची जमीन नव्हती. दुसऱ्यांच्या जमिनीवर तो राबायचा. नाही म्हणायला छोटेसे घर आणि आंगण तेवढे होते.

ठाणसिंगाला जमिनीची माया होती. पशु-पक्ष्यांची माया होती. गुरा-वासरांची माया होती.

शेतात मेहनत करताना कसली म्हणून कसर तो ठेवायचा नाही आणि त्यामुळे सर्वांना तो हवाहवासा वाटायचा.

त्याची चाहूल लागली की, गाई-वासरे हंबरू लागायची आणि त्याने पुठ्ठे ठोकले, मायेने पोळे खाजवले की, हंबरणे थांबायचे!

सकाळी त्याच्या घराजवळचे पक्षी त्याला भूपाळी म्हणून जागवायचे आणि पक्ष्यांची किलबिल ऐकली की, ठाणसिंग लगबगीने उठायचा. एकदा आकाशाकडे नजर टाकून शुक्राच्या चांदणीला हात जोडून तो कामाला लागायचा.

तो खालून चालला की, बुचाची, शिरीषाची फुले त्याच्या अंगावर टपटप पडायची.

तो रस्त्याने चालला की, त्याच्या अंगाचा गंध आसपास दरवळायचा आणि कुत्री नाक फेंदारून त्याच्या दिशेने चालू लागायची.

ठाणसिंगभाऊ म्हणजे निसर्गाचे लेकरू असे सगळे म्हणायचे.

पाहाता पाहाता ठाणसिंग मोठा झाला. एक दिवस फुलाबाईचा बाप त्याच्याकडे आला आणि फुलाबाई त्याची झाली!

ठाणसिंगसारखीच वायको त्याला मिळाली. तशीच कष्टाळू. तशीच प्रेमळ. सर्वांना हवीहवीशी वाटणारी.

फुलावाई नावाप्रमाणे सतत फुललेली असायची. तिच्या चेहऱ्यावर सतत हसू ! इतकी रावराव रावायची, पण कधी थकलेली की, कंटाळलेली दिसायची नाही.

तर ह्या अशा फुलावाईची समाधी गावात आहे. ठाणसिंगची समाधी कुठे आहे असे कोणी विचारले की, लोक सांगायचे तीच त्याचीही समाधी !

फुलावाईच्या समाधीला बोरे वाहिल्याशिवाय गावात कोणी बोराला तोंड लावत नाही. त्याला कारणही तसेच आहे.

ठाणसिंग किंवा फुलावाईने हे बोर चाखलेसुद्धा नव्हते; पण ही बोराची जात गावात आली ती त्यांच्यामुळे.

हे अजव वाटते ना ? आहे सगळे अजवच !

तुम्ही फुलावाईच्या जत्रेला कधी आलात तर हे अजवपणाचे कोडे तुम्हाला कधीतरी उलगडेल.

फुलावाई आणि ठाणसिंग यांचा संसार दृष्ट लागावी असा. सतत आनंदाची वरसात होत होती. लोकांना त्यांचा हेवाही वाटायचा आणि त्यांना पाहून आनंदही वाटायचा. जणू नियतीने त्यांना एकमेकांसाठीच घडवलेले होते ! दिवसामागून दिवस जात होते. कधीच न कोमेजणाऱ्या फुलासारखी दोघांची टवटवी दिसायची. लोक आडून आडून चौकशी करायचे. वाया म्हणायच्या, 'फुलावाई पहाटे मळमळते, वांती होते का ?' वाया असे का विचारतात ते फुलावाईला कळायचे नाही. ती हसू उधळत म्हणायची 'मळमळायचे काय कारण ? वांती कशापायी होणार ?'

‘ वाईग उगा विचारले. रागावलीस ? ’

‘ मी कशापायी रागावू. देवदयेनं असं आरोग्य मिळालंय की कधी दुखलं नाही की खुपलं नाही. ’

‘ अमुक खावं, तमूक प्यावं, असे काही वाटत असंल की ! ’

‘ नाही वा. खायला कोंडा अन् निजायला धोंडा असला तरी आपल्याला काही फरक पडत नाही.’

हे ऐकून बाया फिदीफिदी हसायच्या ! एकाद दिवशी एकादी बाई विचारायची, ‘ आपल्याला बाळ असावं, असं नाही वाटत ? ’

ती म्हणे, ‘ ही सगळी लेकरं आपलीच की ! ’ आता बाया काय बोलणार यावर ? गुमान बसत. आणि खरोखरच फुलाबाई सर्वांवर माया करायची. आजारी माणसाच्या उशा पायथ्याशी रात्र रात्र जागायची. दुखले खुपले पहायची. कोणत्याही कामाचा कंटाळा म्हणून तिला नसे. दळणकांडण, धुणीभांडी, केरवारा सगळे सगळे आनंदाने करायची. घडाघडा पाणी डोक्यावरून आणायची. घडा काठोकाठ भरलेला असला तरी एक थेंबभर पाणी बाहेर जायचे नाही. गावच्या आयाबायांना तिची दया यायची. म्हणायच्या, ‘ किती अश्राप जीव ! पण देवाने तिला पोर देऊ नये, इतका कसा तो निष्ठुर ! ’

पुरुष माणसेही गप्प बसायची नाहीत. ती आडून आडून ठाणसिंगाला विचारायची. कधी म्हणायची, ‘ ठाणसिंगभाऊ, दुसरे लगीन का करीनास ? वंशाला दिवा हवा.’

ठाणसिंग म्हणायचा, ‘ तुमच्या वंशाच्या दिव्याने काय प्रकाश पाडलाय पाहा एकदा ! ’ तो असे फटकन् बोलला की लोक त्याच्यावर रागावत. पण तो जे बोले ते खरेच असे.

एखाद्या वेळी फुलाबाईला ठाणसिंग अंदाज काढत विचारायचा तर ती म्हणायची, ‘ आपल्याला काय कमी आहे ? गावची सगळी लेकरं आपलीच की ! आन त्यातून देवाच्या मनात असलं तर कुणी सांगावं, एकाद दिवशी आपल्यालाही तो लेकरू देईल की, नाही कोणी म्हणावं ? ’

ठाणसिंगाला फुलाबाईचे हे म्हणणे ऐकून समाधान व्हायचे.

ठाणसिंगाच्या घराला एक छोटे आंगण होते. जमीन सगळी वरड, मुरमाड. त्या जमिनीत ना झाडझाडोरा, ना गवत. फुलाबाई अंगण कसे अगदी लख्ख ठेवत असे. तिला अंगणात काडीकचरा दिसला तरी चालायचे नाही. एकाद्या दिवशी ठाणसिंगाला ती म्हणायची 'अंगणात चार रोपं असली तर किती छान दिसेल.'

'अग, पण आपलं अंगण पडलं मुरमाड, रेताड. इथं कधी गवताची काडी गावल्याचं देखील मी पाहिलेलं नाही.'

ठाणसिंगाला वाईट वाटले असे पाहून ती खट्टू व्हायची. म्हणायची 'तुम्हाला राग आला माझ्या बोलण्याचा ?'

ठाणसिंग म्हणायचा, 'तू वेडी का खुळी ? तुझा आणि राग ? असा कोण नतद्रष्ट आहे की तुझा राग करील ?'

दोघे मग एकमेकांकडे पाहून असे गोड हसायचे की सगळे सगळे विसरून जायचे.

दरेक दिवस जणू लग्नाचा पहिला दिवस असावा, अशा आनंदात असायचे. जणू सदाच पौर्णिमा किंवा वसंत ऋतू असावा. दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने आणि वर्षामागून वर्षे अशीच मागे पडत होती. एकादा माणूस, हिंमत करून एकाद्या दिवशी ठाणसिंगला म्हणायचा, 'ठाणसिंगभाऊ, तुम्ही नवस का बोलत नाही.' हे ऐकले की ठाणसिंगाला बोलणाऱ्या माणसाची दयाही यायची आणि रागही यायचा. तो फाडकन म्हणायचा, 'तुकाराम महाराजांनी तीनशे वर्षांपूर्वीच सांगून ठेवले आहे ;की, 'जरी नवसायासे पुत्र होती तरी का करणे लागे पती !' नवससायास सगळे झूट आहे !'

ठाणसिंग असे बोलला की सल्ला देणारा खिशाणा होऊन गप्प बसे !

एक दिवस फुलाबाई अंगण झाडत असताना तिला एका ठिकाणी एक इवलेसे रोप आपल्याकडे टुकूटुकू पाहाते आहे असे दिसले.

फुलाबाई आनंदली. धावत घरात गेली.

‘अहो, अहो, उठा तरी. पहा काय गंमत झाली ते !’

ठाणसिंग साखर झोपेत होता. या कुशीवरून त्या कुशीवर वळून तो पुन्हा घोरू लागला.

फुलाबाई त्याला हलवत म्हणाली, ‘अहो उठा ना ?’

ठाणसिंग हसत म्हणाला, ‘माझी साखर झोप तुला पाहवत नाही ना ?’

‘उगीच नाही उठवलं तुम्हाला, जरा आंगणात येऊन तर बघा.’

‘अंगणात काय शुक्राची चांदणी उतरलीय ?’

‘शुक्राची चांदणीसुद्धा त्यापुढे लाजेल !’

‘शुक्राच्या चांदणीनं लाजावं, असं काय आहे बुवा अंगणात ?’

‘उठा ना. शब्दांनी नाही सांगता येणार. पाहिल्यावाचून विश्वास नाही बसणार. चला उठा झटपट.’

ठाणसिंगाने झटक्यात आळोखे पिळोखे दिले. उठून उभा राहिला आणि म्हणाला, ‘राणी सरकारांचा काय हुकूम आहे ?’

‘भोळे की नाही, मला राणी सरकार म्हणायला ! स्वतःला राजेसरकार बनायचंय म्हणून ही राणीसरकारची लाडीगोडी. पण आज सांगून ठेवते, आधी अंगणात चला मग चहाबिही.’

‘पण आपल्याला बिही काही नको, नुसता चहा पुरे !’

फुलाबाईने हात धरून ठाणसिंगाला बाहेर आणले. वाकून तिने ते टुकूटुकू बघणारे इवले इवले रोप दाखवले. हिरव्या हातांनी जणू ते झेपावू पहात होते !

फुलाबाई हरखली होती. ठाणसिंग तिच्या खुशीने खुश झाला.

फुलाबाई म्हणाली, 'देवाचा निरोप घेऊन हे लेकरू आपल्या अंगणात अवतरलं आहे !'

ठाणसिंग म्हणाला, 'काय आणला आहे त्यानं निरोप अन् तुला तो कसा कळला ?'

'हे पुरुषांना नाही कळायचं. त्यासाठी बायकांचं मन हवं.'

'कोणत्या दुकानात मिळतं हे बायकांचं मन ?'

'उगा चहाटळपणा नका करू ! माझ्या राजाला काय वाटेल.'

'आपण देवासारखे गडीगुप–चिडीचूप बसतो, मग तर झाले!'

'देव असा कधीच बसणार नाही ? तसा बसला असता तर हे रोप कशाला पाठवलं असतं त्यानं ?'

'सगळं सगळं कबूल. पण तुला निरोप कसा कळला ते सांग.'

'आईला छोटचा लेकराचं कसं कळतं ? एकदा मुल रडलं की तिला कळतं की मुलाला भूक लागली आहे, दुसऱ्या वेळी रडलं की तिला कळतं की मुलाचं पोट दुखत आहे.'

'तेच तर विचारतो आहे की हे कसं कळतं ?'

'त्याला माया असावी लागते, माया. माया असली की शब्दा-शिवाय समजतं.'

'आम्हाला नाही बुवा माया !'

'उगा वाद घालताहात. आपल्या घरी हा इवलासा हिरवा पाहुणा आला आहे. त्याचं स्वागत करा ना !'

'बरं बुवा हे हिरव्या इवल्या पाहुण्या तुझे स्वागत असो –

आज ये अंगणा
पाहुणा गोजिरा
ये घरा आमुच्या
सोयरा साजिरा

वाजवा नौबती
ये सखा सोबती
खेळवा संगती
हा जरा लाजरा...

फुलाबाई हळूहळू टाळ्या वाजवत गाण्याला साथ करते. डोलू लागते.

ठाणसिंग तिला न्याहाळीत सुखावतो.

सूर्याचे किरण पूर्वेकडून येतात. त्या इवल्याशा रोपाला उबदार किरणांच्या हाताने कुरवाळतात.

ते रोपही जणू आळोखेपिळोखे देत ताजेतवाने होते. वाऱ्याच्या झुळकेबरोबर ती इवली–इवली पाने हलतात. जणू आईकडे जाण्यासाठी हात पसरतात.

फुलाबाई म्हणते, 'याचे नाव काय ठेवू या ?'

ठाणसिंग म्हणतो, 'तुला ठाऊक आहे ना, एक पावसाळा पाहिल्याशिवाय आपल्याकडे नामकरण करत नाहीत ते ?'

'पण त्याची कारणे वेगळी आहेत.'

'हो ना, गरीबा घरी जन्मलेलं बाळ. पहिलं वर्ष जगलं तर पुढं जगणार. म्हणून एक पावसाळा झाल्यावर नाव. श्रीमंताघरच्या बाळाचं नाव ठेवतात बाराव्या दिवशी. त्या दिवशी बारसं !'

'नाव केव्हाही ठेवा, पण छकुल्या–सोनुल्या म्हणायला काय हरकत आहे ?'

'अगं, ते आपलं आवडीनं हाका मारायचं. ते काही नाव नव्हे.'

'मी मारू हाक ? छकुल्यारे सोनुल्यारे ! पहा कसं हसलं ! '

फुलाबाईच्या जीवनात आज नवा आनंद फुलला होता. त्या रोपाला काय करू नि काय नको असे तिला झाले होते.

ठाणसिंगाने लगेच त्या रोपाभोवती कुंपण केले. बकरीने खायला नको !

फुलाबाईने माती आणून मुळाशी घातली. हळुवार हातांनी पाणी घातले. जणू ती आपल्या छकुल्याला न्हाऊ–माखू घालत होती.

*

फुलाबाई आणि ठाणसिंग यांना रोपाचे काय करू नि काय नको, असे झाले !

सूर्योदयाला दोघे अंगणात येऊन उभे रहायचे. सूर्याचे पहिले सोनेरी किरण त्या रोपावर पडले की, त्याचे ते रूपडे पाहून दोघांना धन्यधन्य होऊन जायचे.

रोप वाढत होते. डोलत होते. नवनवी पाने फुटत होती. नवनव्या इवलाल्या फांद्या येत होत्या.

पानांना रंग तरी किती ! नवे पान लुसलुशीत कोवळे, तांबूस तांबूस. थोडे मोठे झाले की हिरवे. पानाचा आकार वाढत गेला की रंग बदलायचा.

डोळ्यांचे पाते न लववता कितीतरी वेळ ते रोपाकडे पहात असायचे.

संध्याकाळी शेतावरून परतले की आधी अंगणातल्या त्या रोपा-कडे ते जायचे. ते एकदा पाहिले की दोघांचा जीव भांड्यात पडायचा.

फुलाबाई सकाळी उठून जात्यावर दळायला बसली की एका मागून एक ओव्या आणि पीठ बाहेर यायचे !

माझ्या ग अंगणात
कोण आला ग पाहुणा
कसा हालतो डोलतो
कसा साजिरा देखणा।

2004

देवाजीची कृपा झाली
कूस माझी उजवली
गोड भेट ग धाडिली
देवाजीने ।
दिसामासाने वाढतो
कसा हासतो डोलतो
खेळकर किती राजा
माझा जीव फुलवतो ।

ठाणसिंगाला वाटायचे त्या गोड ओव्या कधी संपूच नयेत. पण जात्याची घरघर आणि ओव्या थांबायच्या.

ठाणसिंग लगबगीने उठायचा, फुलाबाईबरोबर अंगणात जायचा. रोपाचे दर्शन घ्यायचा. दर्शनच तर काय? इतर देव दगडाचे, धातूचे, कधी न वाढणारे, न हासणारे – डोलणारे. हा देव जिवंत. रोज वाढणारा !

फुलाबाईचा उत्साह तर अमाप होता. आता दिवसा–रात्री तिला तिच्या त्या राजाची स्वप्ने पडायची. तिच्या डोळ्यात सतत एक स्वप्न तरळत असायचे.

'तो माझा मुलगा आहे, मुलगा ! माझा छकुला, माझा सोनुला. माझा राजा !'

'मुलगा नाही हं. ती माझी मुलगी आहे, मुलगी. पहा कशी हसली !'

'हसली कसली ? रुसला आहे रुसला !'

'बरं बाई, तुझा तो मुलगा, माझी ती मुलगी, छकुली !'

'लहानपणी मलाही आई राजा म्हणायची !'

'माझी आई मला सोनुली म्हणायची !'

'अहो, मुलगा काय नि मुलगी काय, आपल्याला दोन्ही सारखेच. नाही का ?'

'देवाघरचं लेणं. मुलगी काय न मुलगा काय, दोघं सारखंच. आपण माणसांनी हे भेदाभेद आरंभले !'

रोपाने उन्हाळा, पावसाळा, हिवाळा पाहिला.

त्या कशाला न जुमानता ते रोप वाढतच राहिले. उन्हाळ्याने रोप करपले नाही. पावसाळ्यात विरले नाही. थंडीने गारठले नाही. रोज वाढतच राहिले. वाढतच राहिले. कुंपणाच्यावर डोके काढून उभे राहिले. झाडाला बाजूंनी कुंपण घालता येते, पण वर थोडेच कुंपण असते ? रोपाला वरुन आकाश साद घालते आणि ते उंचउंच वाढतच राहाते !

रोपाला हळूहळू स्वतःचे रुप येऊ लागले, ते आपले गुण दाखवू लागले.

एक दिवस सकाळी फुलाबाई आणि ठाणसिंग रोपाची खबरबात घेत असताना ठाणसिंग म्हणाला, 'अगं, हे तर बोराचं रोप दिसतंय. पानं पहा. फांद्यांना बारीक बारीक काटे आहेत. नक्की बोरीच ही. मी म्हणत नव्हतो ही माझी मुलगी आहे !'

'अगबाई खरंच की, बोरीच दिसते आहे. पण आपल्याला काय मुलगा–मुलगी सारखीच, तुम्हीच म्हणाला होता ना ?'

'पण तू कबूल नव्हतीस तेव्हा. सोनुल्या, छकुल्या म्हणत होतीस. अग, मुलगी म्हणजे परक्याचं धन !'

'उगीच काही तरी म्हणू नका. तो जमाना गेला. विसरु ते सारं. आता मुलगी म्हणजे दोघरची धन.'

'कबूल कबूल. मुलगी झाली म्हणून नाराज व्हायचे दिवस संपले. जगात सगळे मुलगेच जन्माला आले असते तर काय झालं असतं ? कल्पना करा !'

'असं होईलच कसं ? मुला–मुलींची संख्या जगात जवळ जवळ सारखीच असते.'

'माणसं एवढी समंजस कुठायत ? मुलगा झाला की पेढे काय वाटतात आणि मुलगी झाली की नाराज काय होतात ?'

‘ पण आपल्याला दोन्ही सारखीच. ’

‘ आपण बदरी म्हणू या हिला ?’

‘ छानच, बदरी, ए बदरी ! पहा ना, कशी पानं फडफडवून साथ देते आहे ! ’

फुलाबाई आणि ठाणसिंग आता सकाळ–संध्याकाळ ‘ बदरी, ए बदरी ’ ही साद घालतच घरातून बाहेर यायचे आणि बाहेरुन घरी यायचे.

बदरी मान डोलवून त्यांच्या हाकेला साथ द्यायची.

*

बोरी हळूहळू वाढत होती. होती बोरीच, पण पाहिले की, इतर बोरींपेक्षा वेगळी वाटायची !

फुलाबाईने ठाणसिंगाला एक दिवस विचारले. ‘ किती दिवसांनी हिला बोरं लागतील ? ’

ठाणसिंग म्हणाला, ‘ चारेक वर्षांनी लागतात. ’

‘ मग यंदा चवथं वर्ष पूर्ण होईल, नाही ? ’

‘ हो, आता चार वर्षं पूर्ण होऊन पाचवं वर्ष सुरु होईल. यंदा हमखास बोरं लागणार ! ’

‘ खरंच ? छान छान बोरं. दळदार, मखमली, तपकिरी कपडे पेनलेली बोरं, सुगंध असा दरवळेल की, विचारता सोय नाही ? ’

‘ तू तर आताच फुलून गेलीस ! ’

‘ मग नको फुलायला. आपली बेटी बदरी, तिला फळं लागणार हा केवढा आनंदाचा प्रसंग. ’

आता रोज बारकाईने बोरीच्या झाडाकडे दोघे पहायचे.

आणि एक दिवस खरोखरच हिरवी हिरवी, इवली इवली बोरे दिसू लागली ! आता फुलाबाईला आणि ठाणसिंगाला काही सुचेनासे झाले. पाळीपाळीने बोरीभोवती पहारा करायचे. रात्री फुलाबाई मध्येच दचकून उठायची आणि बाहेर जाऊन बोरीकडे पाहून यायची. बोरी नीट दिसली की, पुन्हा येऊन बिछान्यावर पडायची. आता तिला स्वप्नेही बोरीचीच पडायची.

फुलाबाई पूर्वी लोकांकडे कामाला जायची, पण ती आता जाईनाशी झाली. शेतीच्या कामात तिचे धड लक्ष लागायचे नाही. मग तिने शेतात जाणेच सोडून दिले.

घराच्या पुढे गवताचा एक छोटासा मांडव ठाणसिंगाने आणि तिने उभा केला. चोपून चोपून अंगण तयार केले. त्या मांडवात चरखा घेऊन ती बसू लागली. सूत काढत बसायची. सूत काढता काढता बोरीवर लक्ष ठेवायची.

संध्याकाळी ठाणसिंग शेतावरुन परत आला की, फुलाबाई म्हणायची, ' पाहिलं का लेकीकडे ? पहा कशी नटून उभी आहे ! तुम्हाला वाटत असेल की, ही पिवळी पिवळी बोरं आहेत, पण फसू नका. तो सोन्याचा बोरहार ती ल्याली आहे ! '

तिला चिडवण्यासाठी ठाणसिंग म्हणायचा, ' ह्या मोहरा आहेत, मोहरा. माझ्या लेकीची पहिली कमाई ! '

' मोहरा याच्यापुढे काहीच नाहीत ! मोहरा माणूस बनवतो, पण या तर देवानं घडवल्या आहेत, देवानं. माणसानं बनवलेल्या मोहरांना ना चव ना स्वाद ! ना बदलते रंग ना वास ! '

' फुले, हे तुझं खरं आहे. ह्या बोरांचा तजेला रोज वाढतो आहे. अशी गब्बू गब्बू बनत आहेत की, विचारता सोय नाही. पाहील त्याचं त्यांच्यावर मन जडेल बघ. '

पहिली बोरं निघाली की, सर्वां घरी वानवळा पोचवीन. सर्वांना वानवळा दिल्याशिवाय आपण बोरीला तोंड देखील लावायचं नाही ! '

'कबूल बाई कबूल, तू म्हणशील ते सगळं कबूल. किती केलं तरी तू बदरीची आई. तुला नाराज करुन कसं चालेल ?'

'आणखी काय काय आहे डोक्यात ?'

'अग, आपल्या घरचं हे पहिलंच कार्य. साऱ्या गावाला रात्री बोलावू या. गोंधळाशिवाय कोणतंही कार्य आपल्याकडे पूर्ण नाही होत.'

'पण आपल्याकडचा गोंधळसुद्धा न्याराच हवा. सगळंच न्यारं मग गोंधळ नको न्यारा ?'

'हवा तर गोंधळही न्याराच हवा.'

'गोंधळी गोंधळी
आम्ही निसर्गाचे गोंधळी...
निसर्ग आहे आमुचा त्राता
निसर्ग म्हणजे अपुला भ्राता
प्राणपणाने रक्षण करता
देई सुखाची टाळी... आम्ही...'

'वाह वा, छानच आहे तुमचा नवा गोंधळ! झालाच पाहिजे असा गोंधळ. कधी झाला नाही असा. आता संक्रांत येईल...'

'बरोबर आहे. संक्रांतीला सुगडात उसाचे कर्वे, हरबऱ्याचे डहाळे, बिब्याची फुलं अन् बोरं घातल्याविगर बोरं कुणी खात नाही उघडपणानं.'

मग संक्रांतीची वाट पहाणे सुरू झाले. रोज नवनवे मुद्दे निघायचे.

फुलाबाई म्हणाली, 'गोंधळ करायचा, जागरण करायचं म्हणजे मोठाच कुटाणा की, खर्चही बराच होईल.'

ठाणसिंग म्हणाला, 'होऊ दे काय व्हायचा तो. आपण मुलाचं लग्न काढलं असतं तर नसता केला खर्च.'

'सगळी संपत्ती खर्च झाली तरी हरकत नाही. अशी कार्यं पुन्हा पुन्हा येत नसतात.'

फुलाबाई म्हणाली, ' लोक खुळ्यात काढतील, खुळ्यात ! '

ठाणसिंग बोलला, ' खुळ्यात आपल्याला लोकांनी कधीच काढलं आहे. नवं थोडंच आहे. रात–दीस तू बोरीवर पहारा करीत होतीस. शेतावर जायचं सोडून बोरं राखायसाठी तू चरखा हाती घेतलास. सारं लोकांनी पाहिलंच आहे की.'

फुलाबाई लटक्या रागानं म्हणाली, ' उगीच मला नका चिडवू. ही बदरी आपल्या अंगणात आली तेव्हा तुम्ही नव्हता खुळावले ? उगी मला नका टोचू. '

ठाणसिंग म्हणाला, ' बरं बाई, आम्हीच खुळावलो. तुम्ही पहिल्यांदा पाहिलं ना तेव्हापासूनच खुळावलो. लोकांनी तेव्हाच खुळा ठरवलं मला ! '

फुलाबाई गोड हसली.

म्हणता म्हणता संक्रांत येऊन ठेपली.

थंडीचा कहार होता, पण फुलाबाई पहाटेच उठली. न्हाऊनधुवून तयार झाली. ठाणसिंगही उठला. तोही तयार झाला.

फुलाबाई एक टोपली घेऊन बोरीकडे निघाली. ठाणसिंग पाठोपाठ आला.

हळुवार हातांनी त्यांनी एकेक बोर काढले. मखमली तपकिरी वल्कलं ल्यालेले बोर. दळदार. घमघमणारे. दोनशे बोरे निघाली !

फुलाबाई नवे कपडे ल्याली. चार अलंकार अंगावर चढवले. जणू वरमाय शोभत होती.

ठाणसिंग एकटक तिच्याकडे पहातच राहिला.

फुलाबाई लाजली !

ठाणसिंग म्हणाला, 'फुले, अगदी वरमाय शोभतेस. पण फार तोरा नको दाखवू वरमायसारखा. जा घरोघर वानवळा देऊन ये. ही आठ बोरं आपल्या दोघांसाठी, तू परत आलीस की आपण खायची हं !'

फुलाबाई म्हणाली, 'लोकांना आवडेल आपला हा वानवळा ? तशा बायका काहीबाही संक्रांतीला लुटतातच, आपण बोरं लुटवली समजू.'

ठाणसिंग बोलला, 'लोक काही का म्हणेनात. आपलं मन स्वच्छ असलं की झालं. मन चंगा तो कठौतीमें गंगा ! आपल्याला तर या बोरांहून आणखी गोड गोष्ट दुसरी नाही. जा बिगीनं आणि झपझप ये. नाहीतर बसशील गप्पा ठोकत एकेका घरी.'

फुलाबाई म्हणाली, 'देव करो नि खूप खूप गोड निघोत बोरं. प्रत्येकजण म्हणाला पाहिजे असली बोरं अख्या दुनियेत सापडणार नाहीत ! काय रंग, काय वास, काय स्वाद !'

ठाणसिंग बोलला, 'अग, तू इतका जीव लावलास बदरीला, ती फळणारच आपल्याला. माणसं कृतघ्न निघतील, पण निसर्ग तसा नाही. तो बरोबर माप पदरात घालील.'

फुलाबाई अंगणाकडे निघाली. पण झटक्यात मागे वळून म्हणाली, 'पहिल्या घरी मी वानवळा दिला की तुम्ही घ्या खाऊन बोरं. किती वेळ तिष्ठत बसणार.'

ठाणसिंग बोलला, 'वा ग वा ! एकट्यानं खाण्यात काय गंमत आहे ? साऱ्या गावाला वानवळा द्यायला निघालीस आणि मी तुझ्या बिगर खाऊ होय ? शक्यच नाही. पण लौकर ये हं. तोंडाला पाणी सुटूसुटू मी बेजार होईन नाहीतर !'

फुलाबाई बोरीकडे वळली. बोलली, 'बदरी बेटा, तुझी सेवा-चाकरी केली. तुला जीव लावला. सगळ्यांना संतोष वाटू दे बोरं खाताना !'

आणि खरोखरच एखादी वरमाय मिठाई वाटायला जाते तशा ऐटीत फुलाबाई निघाली.

थोडा वेळ गेला आणि एक गावकरी आला. अंगणातूनच त्याने पुकारले, 'ठाणसिंगभाऊ आहे का घरात, ठाणसिंगभाऊ!'

ठाणसिंगची तंद्री लागली होती. त्या हाकेने तो भानावर आला, म्हणाला, 'या सुपडूभाऊ, या असं अचानक कुणीकडं येणं केलं?'

सुपडूभाऊ हसत म्हणाला, 'अचानक? हो अचानकच म्हणायचं. ठाणसिंगभाऊ, अरे काय बोरं पण बोरं आहेत! आपण इतक्या दिवसांत कधी अशी बोरं खाल्ली नाहीत. देवाशपत. काय पाणी घालत होता की अमृत कोण जाणे!'

ठाणसिंग सुखावला. बोलला, 'आपण खाल्लीत तर बोरं?'

सुपडूभाऊ म्हणाला, 'खातोय कसली बोरं. जेमतेम एकेक वाट्याला आलं. चाखलं आणि तब्येत खुश झाली. धावतच आलो इकडे. आता पाच–दहा बोरं खाल्याविगर इथून हालणार नाही बघ!'

ठाणसिंग म्हणाला, 'फुली सगळी बोरं घेऊन गेली. आमच्या दोघांपुरती ही आठ काय ती ठेवली आहेत!'

सुपडूभाऊ बोलला, 'बोरी तुमचीच आहे. तुम्हाला उद्या–परवा खाता येतील. पण वानवळा काही कोणी रोज वाटत नसते. दे मला ती बोरं. एक बोर मिळालं आणि तोंड खवळलं बघ. राहवलंच नाही. लाज लज्जा सोडून आलो धावत!'

ठाणसिंग खुश झाला. म्हणाला, 'अशी बोरीची झाडं सगळीकडे लागली पाहिजेत. सर्वांना खूप खायला मिळाली पाहिजेत. या बोरीच्या पुढच्या साली कलम करू इतर बोरींवर.'

सुपडूला धीर निघेना. म्हणाला, 'त्या साऱ्या लांबच्या गोष्टी. मेल्यावर स्वर्ग मिळण्याचं आश्वासन काय उपयोगी? रोख काय ते बोल. पण सांगून ठेवतो, तुझ्याकडून बोरं घेतल्याविगर मी हलणार नाही इथून!'

फुलाबाई येण्याच्या आत ही बला टाळावी म्हणून ठाणसिंगाने चार बोरं त्याच्या हातावर ठेवली.

सुपडूभाऊ तरातरा तिथून निघून गेला.

ठाणसिंगाने सुटकेचा एक निःश्वास सोडला आणि तो फुलाबाईच्या वाटेकडे डोळे लावून बसला.

एवढ्यात लोटनभाऊ येऊन थडकले. म्हणाले, 'ठाणसिंगभाऊ, कमाल केलीत अगदी ! काय बोरं आहेत तुमची ! सफरचंद झक मारतं त्याच्यापुढे. अगदी अस्सल काश्मिरी असलं तरी लाजून शरमिंदं होईल बघा !'

ठाणसिंग म्हणाला, 'वानवळा चाखलात तर आमचा गरीबा घरचा ?'

लोटनभाऊ म्हणाला, 'अरे वानवळा काय पुरतो ? चार बोरं आणखी द्याच. त्यावाचून समाधान नाही व्हायचं. तोंड असं चाळवलंय.'

ठाणसिंग काकुळतीने म्हणाला, 'द्यायला तशी हरकत नाही, पण ना मी अजून बोर चाखलं ना फुलाबाईनं. पहिला हक्क गावाचा. फुलाबाईला सांगितलं, गावात वानवळा लुटून ये, मग आपण चाखू बोरं.'

लोटनभाऊ बोलला, 'झाड तर तुमचंच आहे. तुमच्या अंगणात आहे. केव्हाही खाल बोरं, पण आम्हाला थोडी रोजरोज मिळणार ?'

ठाणसिंग म्हणाला, 'तुम्ही या चार दिवसांनी, तोवर निघतील आणखी बोरं. दुसऱ्याला खाऊ घालण्यात केवढा आनंद असतो ! मग खा दहावीस.'

लोटनभाऊ बोलला, 'उद्याचं कुणी पाहिलं आहे. हातातला एक पक्षी झाडावरच्या दोन पक्षांपेक्षा फायदेशीर असतो. द्या ती चार बोरं मला आणि घ्या दुवा '

शेवटी ठाणसिंगाचा नाईलाज झाला. त्याने ती चार बोरे लोटनभाऊच्या हातावर ठेवली.

जाता जाता लोटनभाऊ म्हणाला, 'ही बोरं जणू स्वर्गातल्या झाडाची आहेत. अमृताहून गोड ! ठाणसिंगभाऊ रागावू नका हं.

२२०५

कारभारणीला समजावा ! '

ठाणसिंग फुलाबाईची वाट पहात राहिला.

*

वानवळा वाटता वाटता फुलाबाईची पुरेवाट झाली. प्रत्येक चाखणारा त्या बोरांची स्तुती करायचा. तिला थांबवून सर्व गोष्टी विचारायचा. लुटवायचा ही गोष्ट सोपी नव्हती. तिने वानवळा लुटवायची सुरवात केली तीच मुळी गरीब, दुबळे, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्यांच्या घराकडून. त्या पोरांना आजवर कोणी घरी आणून काही दिले नव्हते ! रानचा बोरासारखा मेवासुद्धा त्यांना लपून छपून खावा लागायचा !

फुलाबाई घरी पोचता पोचता मध्यान्ह झाली. विचारी शिणली-थकली होती.

फुलाबाईची ठाणसिंग वाटच पाहात होता. ती आली. त्याचा खिशाणा चेहरा पाहून म्हणाली, ' असे उदासवाणे का बसला आहात ? '

ठाणसिंग बोलला, ' अग, तुझ्या–माझ्यासाठी आठ बोरं ठेवली होती. पण सुपडूभाऊ आणि लोटनभाऊ आले. हाटून बसले बोरं पाहि-जेच म्हणून, काही ऐकेचनात. घेऊन गेले सगळी बोरं. घेऊन गेले म्हणजे मीच देऊन टाकली. वानवळा आपल्या मुखी लागण्याचा योग नव्हता बघ. '

फुलाबाई म्हणाली, ' एवढंच ना ? गावातल्या प्रत्येक घरानं बोरं खाल्ली म्हणजे आपणच खाल्ली की ! त्यासाठी एवढं उदास व्हायचं काय कारण ? आणि प्रत्येकजण बोराची अशी स्तुती करत होता की विचारू नका. '

ठाणसिंग बोलला, ' ही सगळी तुझ्या मेहनतीची पुण्याई. किती राबलीस त्या झाडासाठी ! '

फुलावाई म्हणाली, ' झाडासाठी ? अहो, आपली ती बेटी. बदरी. आपल्या बेटीसाठी आई हातांचा पाळणा आणि डोळ्यांची निरंजन करते: तिला राहवतच नाही. मग काय करणार ?'

ठाणसिंग बोलला, ' माफ कर. मी विसरलोच की ती आपली बटी वदरी आहे ते. शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी ! फुले, काय एकेक बोर होतं, डोळ्यांपुढून हलता हलत नाही ! काय त्याचा तो डौलदार मखमली तपकिरी पोषाख, काय त्याचा तो ऐटदार बांधा आणि त्याचा तो घमघमाट ! चव काही आपल्याला चाखायला नाही मिळाली, पण लोकांनी अमृताशी तुलना केली बघ. तुझी मेहनत, तू बदरीला लावलेला जीव, त्यामुळे हे घडलं. बाळ व्हावा ऐसा गुंडा, त्याचा तिन्ही लोकी झेंडा !'

फुलावाई म्हणाली, ' सगळी मेहनत काही माझी एकटीची नाही. तुम्ही तरी किती हळुवार झाला होता ! मुलं ही दोघांचीच असतात. बऱ्यावाईटाचे दोघे धनी !'

ठाणसिंग बोलला, ' आता याच प्रकारची बोरं सगळ्या मेहरूण गावात आपण लावू या. याचं कलम करू या. मेहरूणची किर्ती या बोरांमुळे सर्वत्र पसरली पाहिजे.'

फुलावाई म्हणाली, ' आता किती रंगवाल स्वप्नं ? रात्री गोंधळ घालायचं ठरवलं आहे, आहे ना ध्यानात ? तयारीला लागायला हवं.'

ठाणसिंग बोलला, ' पण सर्व घरात सांगितलंस ना, गोंधळाला यायचं ते. नाहीतर विसरली असशील लेकीचं कौतुक ऐकता ऐकता !'

फुलावाई म्हणाली, ' अगदीच की हो मी विसरले ! आता दोन घास खाऊन घ्या अन् जा सर्वांना आवताण द्यायला. छान बाजरीची भाकर करून त्यावर तीळ लावते. वांग्याचे भरीत करते. खाऊन जा.'

ठाणसिंग बोलला. ' खरं सांगू फुले ? हे सगळं ऐकून पोट कसं भरून गेलंय. हा आता येतो सांगून गोंधळाचं. आलोच बघ. तू तयार ठेव सगळं.'

फुलाबाई बोलली, ‘ असा काय मोठा लग्नाचा स्वयंपाक करायचा आहे. तुमच्या पावलाची चाहूल लागली की भाकरी टाकते. ’

ठाणसिंगाने चढाव घातला आणि तीरासारखा वेगाने निमंत्रण द्यायला तो निघाला. दारातूनच हाळी घालून त्यानं प्रत्येकाला निमंत्रण केले. लोक बाहेर येऊन उठून थांबवतील म्हणून तो लगोलग पुढे सटकायचा.

भर उन्हात तो फिरला. संक्रांतीचा दिवस. ऊन आता हळूहळू वाढत जाणार!

घरी आला. दोन घास खाल्ले. अंगात कणकण वाटत होती. पण बोलला असता तर फुलाबाईच्या उत्साहावर विरजण पडले असते.

उभारी धरून त्याने तयारी केली. रात्र झाली आणि लोक जमू लागले. अंगण माणसांनी फुलून गेले. संबळ वाजू लागली. उदेउदे झाले. संबळवाला फार हुषार होता.

‘ आम्ही गोंधळी, गोंधळी
महरूण गावाचे गोंधळी ’

असे म्हणून त्याने सुरवात केली आणि बदरीची सारी कहाणी गोंधळात गुंफली.

बोर नव्हे ही बोर
ही तर फुलाबाईची पोर
बोर नव्हे ही बोर
ही तर ठाणसिंगची पोर
फुलाबाई अन् ठाणसिंग
बदरीच्या सेवे मधी दंग
माया लावली माया
केली अमृताची किमया

‘ बोर नव्हे ही बोर, ही तर फुलाबाईची पोर ’ हे तो अशा झोकात म्हणायचा की सर्वांच्या माना दाद द्यायच्या.

फुलाबाई म्हणाली, 'झाडासाठी ? अहो, आपली ती बेटी. बदरी. आपल्या बेटीसाठी आई हातांचा पाळणा आणि डोळ्यांची निरंजन करते. तिला राहवतच नाही. मग काय करणार ?'

ठाणसिंग बोलला, 'माफ कर. मी विसरलोच की ती आपली बेटी बदरी आहे ते. शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी ! फुले, काय एकेक बोर होतं, डोळ्यांपुढून हलता हलत नाही ! काय त्याचा तो डौलदार मखमली तपकिरी पोषाख, काय त्याचा तो ऐटदार बांधा आणि त्याचा तो घमघमाट ! चव काही आपल्याला चाखायला नाही मिळाली, पण लोकांनी अमृताशी तुलना केली बघ. तुझी मेहनत, तू बदरीला लावलेला जीव, त्यामुळे हे घडलं. बाळ व्हावा ऐसा गुंडा, त्याचा तिन्ही लोकी झेंडा !'

फुलाबाई म्हणाली, 'सगळी मेहनत काही माझी एकटीची नाही. तुम्ही तरी किती हळुवार झाला होता ! मुलं ही दोघांचीच असतात. बऱ्याबाईटाचे दोघे धनी !'

ठाणसिंग बोलला, 'आता याच प्रकारची बोरं सगळ्या मेहरूण गावात आपण लावू या. याचं कलम करू या. मेहरूणची किर्ती या बोरांमुळे सर्वत्र पसरली पाहिजे.'

फुलाबाई म्हणाली, 'आता किती रंगवाल स्वप्नं ? रात्री गोंधळ घालायचं ठरवलं आहे, आहे ना ध्यानात ? तयारीला लागायला हवं.'

ठाणसिंग बोलला, 'पण सर्व घरात सांगितलंस ना, गोंधळाला यायचं ते. नाहीतर विसरली असशील लेकीचं कौतुक ऐकता ऐकता !'

फुलाबाई म्हणाली, 'अगदीच की हो मी विसरले ! आता दोन घास खाऊन घ्या अन् जा सर्वांना आवताण द्यायला. छान बाजरीची भाकर करून त्यावर तीळ लावते. वांग्याचे भरीत करते. खाऊन जा.'

ठाणसिंग बोलला. 'खरं सांगू फुले ? हे सगळं ऐकून पोट कसं भरून गेलंय. हा आता येतो सांगून गोंधळाचं. आलोच बघ. तू तयार ठेव सगळं.'

फुलाबाई बोलली, 'असा काय मोठा लग्नाचा स्वयंपाक करायचा आहे. तुमच्या पावलाची चाहूल लागली की भाकरी टाकते.'

ठाणसिंगाने चढाव घातला आणि तीरासारखा वेगाने निमंत्रण द्यायला तो निघाला. दारातूनच हाळी घालून त्यानं प्रत्येकाला निमंत्रण केले. लोक बाहेर येऊन उठून थांबवतील म्हणून तो लगोलग पुढे सटकायचा.

भर उन्हात तो फिरला. संक्रांतीचा दिवस. ऊन आता हळूहळू वाढत जाणार!

घरी आला. दोन घास खाल्ले. अंगात कणकण वाटत होती. पण बोलला असता तर फुलाबाईच्या उत्साहावर विरजण पडले असते.

उभारी धरून त्याने तयारी केली. रात्र झाली आणि लोक जमू लागले. अंगण माणसांनी फुलून गेले. संबळ वाजू लागली. उदेउदे झाले. संबळवाला फार हुषार होता.

'आम्ही गोंधळी, गोंधळी
महरूण गावाचे गोंधळी'

असे म्हणून त्याने सुरवात केली आणि बदरीची सारी कहाणी गोंधळात गुंफली.

बोर नव्हे ही बोर
ही तर फुलाबाईची पोर
बोर नव्हे ही बोर
ही तर ठाणसिंगची पोर
फुलाबाई अन् ठाणसिंग
बदरीच्या सेवे मधी दंग
माया लावली माया
केली अमृताची किमया

'बोर नव्हे ही बोर, ही तर फुलाबाईची पोर' हे तो अश झोकात म्हणायचा की सर्वांच्या माना दाद द्यायच्या.

मध्यरात्र उलटली आणि गोंधळाचा रंग चढत गेला. संवळ वाजवणाराच्या हातांनीही अशी गती घेतली की अखेर विलक्षण असा आवाज सर्व परीसरात घुमू लागला.

पहाटे पहाटे गोंधळ संपला. तीळगूळ सर्वांना वाटला. गोंधळाच्या कैफातच लोक परतले. अंगण रिकामे झाले. ठाणसिंग आणि फुलावाई भारी समाधानात होते. त्यांच्या घरचे कार्य आनंदाने पार पडले होते.

ठाणसिंगाने चवाळयावर अंगणात देह टाकला. तो बोरीकडे एकटक पाहात होता. त्या नजरेत केवढा अभिमान भरला होता !

ठाणसिंगाजवळच एका पटकुरावर फुलावाई पडली. ठाणसिंग म्हणाला, 'करीची थंडी आहे. अशी पटकुरावर का पडलीस ?'

फुलावाई बोलली, 'सारं कसं मनाजोगतं पार पडलं ! आता फटफटेल. आत झोपलं तर घटकाभर डोळा तरी लागेल.'

ठाणसिंग म्हणाला, 'ते खरं ग, पण मग ही आपली लेक वदरी दृष्टीआड होईल ना ? तिच्यावर सूर्याचं ऊन आलं म्हणजे कशी दिसते ? जणू तरणीवांड उफाडयाची पोर !'

फुलावाईने त्याच्या अंगावर हात टाकला. म्हणाली, 'फार थकला दिवसभर !' पण झटक्यात तिने हात मागे घेतला. म्हणाली, 'काय हा तापतरी ! अहो सांगायचं नाही !'

फुलावाई उशाशी वसली. तिने पाण्याची पट्टी कपाळावर ठेवली. पण ताप फणफणतच होता. अंग तव्यासारखे तापले होते.

लोकांच्या डोळयांवरून रात्रीच्या गोंधळाची धुंदी अद्याप उतरली नव्हती.

आणि ठाणसिंगाची शुद्ध हरपली ! तो वरळू लागला. म्हणू लागला, 'ही वदरी आपली लाडाची पोर. एकुलती एक. तिला जपले

पाहिजे. अशा बोरींचं वनच्या वन उभं राहिलं पाहिजे. मेहरूण बोरांमुळे देशभर गाजलं पाहिजे. सुपडूभाऊ, लोटनभाऊ म्हणाले ते खोटं नाही. माझ्या फुलीनं रक्ताचं पाणी नाही, अमृत केलं. ते वदरीला आकंठ पाजलं...उगा अशी अमृताची बोरं नसतात पिकत... '

फुलाबाई त्याला आवरत म्हणाली, 'अहो, मी इथंच तुमच्याजवळ आहे. तुम्ही काळजी करू नका. तुम्ही म्हणता तसं होईल. तुम्ही बरे तर व्हा. मग आपण दोघं लागू त्या कामाला. जरा स्वस्थ पडा ना. ताप काय फणफणला आहे!'

फुलाबाईनं फाटक उघडलं. जाणारा–येणाराला पुकारलं. लोक हळूहळू जमले. कोणी काही कोणी काही सुचवू लागले. फुलाबाई क्षणभरही त्याच्यापासून हलत नव्हती.

मधून मधून ठाणसिंग शुद्धीवर यायचा. बोरीकडे एकटक पहायचा. मग ग्लानी आली की निपचित पडायचा. कधी वात झाल्यासारखा वरळायचा.

ठाणसिंग मधूनच ओरडत उठायचा, 'फुले, आपल्या वदरीला सांभाळ. जीव लाव. गावाचं नाव करणार ही आपली लेक. तिची वंशावळ वाढव.'

फुलाबाई सारखी ठाणसिंगाच्या उशाशी बसून होती. ठाणसिंग आरडाओरडा करायला लागला की ती कासावीस व्हायची. म्हणायची, 'तुम्ही काळजी करू नका. आधी बरे व्हा. आपण दोघे मिळून सर्व गोष्टी करू.'

गावात होण्यासारखे सगळे उपाय करून झाले, पण ठाणसिंगाच्या आजाराला उतार म्हणून पडला नाही वाटले होते अतिश्रमाचा ताप आहे, जाईल. पण तो मृत्यूचा ताप होता! मोठ्यातल्या मोठ्या वैद्यापाशीही उपचार नसलेला ताप!

सातव्या दिवशी तिकडे सूर्य उदयाला आणि इकडे फुलाबाईच्या जीवनातला सूर्य कायमचा मावळला!

फुलावाईला कोणाचाच आधार नव्हता. एक लहान भाऊ गावाकडे होता, तो आजाराची बातमी ऐकून आला. फुलावाईने त्याला घरी ठेवून घेतले.

कोणी म्हणाले, ' ही बदरी अपशकुनी. तिनंच आपल्या बापाला खाल्लं ! '

असे कोणाकडून ऐकले की फुलाबाई त्याच्यावर चवताळून उठे. म्हणे, ' माझं आता तेवढंच एक सुख काय ते राहिलं आहे, तेही पाहवत नाही का या लोकांना ! '

ती बोरीला आणखीनच माया लावू लागली. आणि बोरी त्याला चांगली दाद देऊ लागली. बोरी आणखीनच भरली.

फुलावाई ठाणसिंगसाठी रडरड रडली. पण पुढे डोळयातले सारे पाणीच आटून गेले. तिचे रडणे बंद झाले, पण तिच्या चेहऱ्यावर पूर्वीचा आनंद कधी दिसला नाही. उदास-दु:खी कष्टी असायची. ती बोरी हाच काय तो तिला एक विरंगुळा त्या दु:खात होता.

तासंतास ती बोरीशी गोष्टी करायची. लोकांना वाटायचे फुलावाईला वेड लागले ! बोरीशी का कोणी गप्पा मारते ?

एकादा धटिंगण तसे बोलल्याचे कानी आले की फुलावाई म्हणायची, ' हे वेड समजायला मोठं मन लागतं, मोठं मन. माणसाच्या कुटुंबात काही नुसती माणसंच नसतात. नुसती माणसंच असती तर जीव कंटाळून गेला असता. माणसाचा गोतावळा माणसांच्या पलीकडे असतो. गायी-गुरे, चिमण्या-कावळे, पोपट-मैना, कबुतर-बगळे हे त्याच्या गोतावळयात असतात. कुत्री-मांजरं तर त्याच्या घरादारात वावरतात. अंगणीची तुळस त्याच्या घरातली. वड-पिंपळ-चिंच काय नि शेवगा-जांभुळ-करवंदी काय, त्याच्याच गोतावळयातली. ही बदरी नाही माझं लेकरू ?

पण हे समजायला मन मोठं असावं लागतं. जेवढं मन मोठं तेवढं माणसाचं कुटुंब मोठं ! तुमच्या दृष्टीनं ते बोराचं झाड आहे, पण माझी

तर ती लेक आहे. यांची शेवटची इच्छा होती की मेहरूणच्या साऱ्या परिसरात अशी बोराची झाडं सर्वत्र पसरवायची. तपकिरी, मखमली अंगरखा ल्यालेली. अंगापिंडनो ठसठशीत भरलेली, स्वाद आणि मिठ्ठास जिभेवर रेंगाळत ठेवणारी, वाऱ्यावरोवर सुगंधाचं निमंत्रण देणारी बोरं जिच्या अंगाखांद्यावर मिरवतील अशा बोरींची लागवड सर्वत्र झाली पाहिजे ! '

' फुलावाईने आता चांगले लेणे पांघरणे सोडले, एकतर वोरीशी गोष्टी करायची नाहीतर गावातल्या दुबळ्या-आजारी माणसांची सेवा तरी करत असायची. गावात गेली तर बोरी भावाच्या अंगी लावून जायची.

बोरीला बोरे लागायची वेळ झाली की ती त्या बोरीपासून घटकाभरसुद्धा दूर व्हायची नाही. दिवसभर राखण करायची. रात्री-अपरात्री दचकून उठायची. वागेत फेरी करायची. सर्व ठाकठीक आहे असे दिसले की मग परत घरात येऊन झोपायची.

❊

पहिल्या वर्षीप्रमाणे फुलाबाई बोरांचा वानवळा वाटत गावात फिरली, पण तिने स्वतः एकही बोर चाखलं नाही. म्हणायची, ' यांच्या तोंडाला एकही बोर लागलं नाही, मग मी कशी चाखू ?'

तिचा भाऊ मात्र पोटभर बोरे खायचा आणि म्हणायचा, 'असली बोरं तर स्वर्गातसुद्धा नसतील. अमृतसुद्धा या बोरांपुढं फिक्कं लागेल. फुले, तू चाखून तरी पहा. सगळा गाव वाखाणतो आहे बोरं. तू अशी अभागी कशी ?'

फुलावाई म्हणायची, ' अभागी तर खरीच, नाहीतर हे असे अचानक गेलेच कसे असते ? वय का झालं होतं त्यांचं ? आले देवा-जीच्या मना, तेथे कोणाचे चालेना ! '

जळगावच्या व्यापाऱ्यांना मेहरूणच्या बोरांची बातमी लागली.

त्यांनी बोरं चाखून पाहिली. त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. अशी बोरे हाती आली तर सगळा बाजार हातात येईल, असे त्यांना वाटले.

एक दिवस एक व्यापारी आला. फुलाबाईला म्हणाला, ‘ काय ग, तुझी बोरं अगदी अमृतासारखी आहेत. ’

फुलाबाईने चार बोरे व्यापाऱ्याच्या हातावर ठेवली. म्हणाली, ‘ मी काही बोरं चाखून पाहिली नाहीत. ’

व्यापारी आश्चर्य दाखवत म्हणाला, ‘ काय म्हणतेस ? तू बोर नाही चाखलंस ! सारी पंचक्रोशी तुझ्या बोरांची वाहवा करतीय आणि तू चाखलं नाहीस ! ’

फुलाबाई म्हणाली, ‘ कशी चाखणार ? ह्यांनी कुठं चाखलं होतं. मग मी कशी चाखणार ? पण त्यांनी जीव लावला बोरीला. म्हणायचे, हीच आपली मुलगी. बदरी ! किती माया केली या बदरीवर. पण बोर काही चाखू शकले नाहीत. त्यांच्या हातचं अमृत मिळालंय तिला ! ’

व्यापारी म्हणाला, ‘ नाहीतरी तू बोरं खातच नाहीस, मग मला या हंगामापुरती विकत का देत नाहीस ? ’

फुलाबाई म्हणाली, ‘ विकत मागताना तुझी जीभ कशी झडली नाही ? पोटचा गोळा कुणी विकते का भाड्याने देते ? ’

व्यापारी म्हणाला, ‘ फुलाबाई, बोलायला हे सगळं ठीक असतं. पण व्यवहार पाहिला पाहिजे. अख्ख्या गावाला बोरं वाटतेस. तुला काय मिळणार आहे त्यातून.’

फुलाबाई म्हणाली, ‘ तुला नाही कळायचं ते. तुला फक्त छन छन नाणी कळतात. अरे, त्या बोरांपुढे तुझ्या त्या निर्जीव मोहरा तुच्छ आहेत, तुच्छ ! आणि बोरं चाखल्यावर लोकांच्या चेहऱ्यांवर जे खुशीचं चांदणं पसरतं त्याला तर दुसरी तोड नाही.’

व्यापारी बोलला, ‘ फुलाबाई, ज्याला बोरं खाऊशी वाटतील ते घेतील की बाजारातून विकत.’

फुलाबाई रागाने म्हणाली, ‘ म्हणजे गरीबाला ती कधीच मिळा-

यची नाहीत ! बोराचा वानवळा मी वाटते तेव्हा आधी गरीब घरापासून सुरुवात करते. बिचाऱ्यांच्या वाट्याला नाहीतर चांगल्या वस्तू कधी यायच्या ?'

दुसरा व्यापारी म्हणाला, 'तो दलिंदर तुला काय पैसे देणार ? मी पाचशे देतो रोकड पाचशे ?'

फुलाबाई म्हणाली, 'या बदरीची सेवा करताना जो आनंद मिळतो, त्यापुढे तुझे ते पैसे झक मारतात !'

व्यापारी लोचटपणे म्हणाला, 'अग, मी सौदा बोरांचा करतो आहे. तू करत जा ना खुशाल सेवा. कोण मना करतो !'

फुलाबाई म्हणाली, 'मग आता सारखं थोडंच असणार ? आता आपलं आहे, उद्या दुसऱ्याचं होईल. आता मी माझ्या मनाप्रमाणे साऱ्या गावभर बोरं वाटते. मग तर तू बोराला हातही लावू द्यायचा नाहीस ! पोरंटोरं बोरांकडे पाहून नुसते उसासे सोडतील ! मला लाख शिव्या मोजतील ! म्हणतील लोभट कुठली ! नको रे बाबा तसला कलंक. त्यापेक्षा मी गरीब राहिलेली परवडेल.'

फुलाबाई कुठल्या शाळेत शिकायला गेली नव्हती. तिला लिहिता वाचता धड येत नव्हते. कधी कीर्तनकारांचे किंवा प्रवचनकारांचे तिने ऐकले नव्हते. षड्रिपूंची तिला ओळखही नव्हती. तिला होते माणसाबद्दल प्रेम, गरीब दुबळ्यांची माया. पोराटोरांबद्दल तिला अपार कळवळा होता.

संक्रांत आली. फुलाबाईने व्यापाऱ्यांना थारा दिला नाही. तिने घरोघर जाऊन वानवळा लुटवला आणि ती समाधान पावली.

एखादा दिवस गेला असेल नसेल, सैतानभाऊ तणतणत तिच्या घरी आला. म्हणाला, 'आमची बोरं कुठं आहेत ?'

फुलाबाईला उमजेना त्याला काय सांगावे. ती म्हणाली, 'सैतानभाऊ, अरे चार वेळा तुझ्या घरी जाऊन आले. पण घराला टाळं ! काय करणार ! बोरं वाटून दिली. नाहीतर सडली असती ना !'

सैतान नावाप्रमाणे सैतान होता. रागीट, थोडक्या थोडक्यावरून हाणामारी करणारा. त्याचे डोळे सदा तांबारलेले असत. त्याच्याकडे पाहिले की लोकांचा थरकाप उडे. तो म्हणाला, ‘आमची बोरं सडली असती तर सडली असती. तू कोण दुसऱ्यांना वाटणारी ? आमच्या नावानं ठेवून द्यायची घरात.’

फुलाबाईलाही खूप राग आला. बोरे तिची होती. त्यांचे ती वाटेल ते करील. तिला विचारणारा सैतान कोण ? पण नरमाईने म्हणाली, ‘सैतानभाऊ, असा उगा डोक्यात राख घालू नको. अरे, बोरं सडली असती तर तुला काय मिळालं असतं ? आता निदान कोणाच्या तरी मुखी लागली. वाटून आता संपली. पुढच्या वर्षी दुप्पट वानवळा लुट-वीन, मग तर झालं.’

सैतान गरजला, ‘पुढच्या वर्षी तू खूप दुप्पट देशील, पण तू जगणार आहेस आणि मी जगणार आहे याची हमी कोण देणार ? तुझी चूक झाली आहे.’

फुलाबाई नरमाईने म्हणाली, ‘सैतानभाऊ, झाली चूक कबूल. माफी मागते. मग तर झाले.’

सैतान ओरडून म्हणाला, ‘मला बोरं मिळणार नसतील तर तुझी बोरी जगली काय न मेली काय, मला काय त्याचं !’

फुलाबाई म्हणाली, ‘असं नको म्हणूस सैतानभाऊ. तुझ्या ठाण-सिंगभाऊंनी एकही बोर कधी चाखलं नाही. पण म्हणून मी कधी म्हणत नाही की बोरीचा मला उपयोग नाही, मग ती जगली काय नि मेली काय ! माणसानं इतकं आपल्यापुरतं पाहू नये. इतरांचा विचार करावा. अरे, दुसऱ्याच्या चेहऱ्यावरचा आनंद हे सर्वात मोठं समाधान असतं. सैतानभाऊ कल्पना कर. तुझ्या वाटचाची बोरं ज्यानं खाल्ली त्याच्या चेहऱ्यावर केवढा आनंद झळकला असेल !’

सैतानभाऊ समजून घ्यायलाच तयार नव्हता. रागाने नुसता फणफणत होता. म्हणाला, ‘फुलाबाई, मला ते काही समजत नाही. तू माझी बोरं वाटणारी कोण ? ती सडली असती तरी चाललं असतं. जे

माझ्या मुखी लागणार नसेल ते असलं काय आणि नसलं काय, मला सारखंच. मी तुला अद्दल घडवणार याची, सांगून ठेवतो !'

तरी फुलाबाई बोलली, 'सैतानभाऊ, शांत हो, असा भडकून जाऊ नकोस. बोरं सर्वांची आहेत असंच मी मानते. ती माझ्या अंगणात आहे, मीच देखभाल करते, पण मी बोरं चाखतसुद्धा नाही. सर्वांच्या मालकीची बोर असंच मी समजते. शांत हो.'

सैतान फणफणतच निघून गेला.

लोकांची मने चरकली.

फुलाबाईने भावाला बोलावलं. म्हणाली, 'भाऊ, सैतानभाऊचं लक्षण ठीक दिसत नाही. तो वाटेल ते करील, झाड तोडून टाकायलाही कमी करणार नाही. तेव्हा एक ध्यानात ठेव. बदरी माझी लेक. ठाणसिंग गेल्यावर मी जगले तिच्या आधारावर. ती मला जीव की प्राण आहे ! बदरी गेली तर मी जगणार नाही...'

भाऊ बोलला, 'फुले, असं वाईट वंगाळ बोलू नको.'

फुलाबाई म्हणाली, 'आशा चांगल्याची बाळगावी, पण तयारी वाईटात वाईट झालं तर काय, त्याची करावी.'

भाऊ बोलला, 'मी तुझ्या हुकमाबाहेर नाही. काय करू सांग.'

फुलाबाई म्हणाली, 'बोरी समजा त्याने तोडली तर मी जगणार नाही, पण ही अमृताची बोरं दुनियेतून कायमची जाता कामा नयेत.'

भाऊ बोलला, 'पण त्यानं झाडच तोडून टाकलं तर ?'

फुलाबाई म्हणाली, 'मन चिंती ते वैरी न चिंती अशी म्हण आहे. सैतानभाऊचा आजवरचा अनुभव पाहाता तो फार खुनशी आहे. काय करील त्याचा नेम नाही.'

भाऊ बोलला, ' मी काय करू ते सांग. तुझ्या इच्छेबाहेर मी नाही. '

फुलाबाई म्हणाली, ' त्यानं झाड तोडलं आणि मी मरून पडले तरी धीर सोडू नको. आसपासच्या सगळ्या बोरींवर कलम बांध. एकही बोर तशी राहाता कामा नये. कलम यशस्वी होईल. बाईटातही देवाचा, न कळणारा पण चांगला हेतू असू शकतो.'

भाऊ बोलला, ' तुझ्या इच्छेबाहेर मी नाही. जरूर हे काम मी करीन. '

फुलाबाई म्हणाली, ' मला याचीच गंमत वाटतेय की आजवर हे कसं माझ्या ध्यानी आलं नाही ? मी आपली स्वत:लाच गोंजारत, कुरवाळत बसले. नाहीतर एव्हाना सगळा मेहरूणचा परिसर, ह्या बोरींनी गजबजला असता. देवाच्या मनात हेच दिसतंय. सैतानभाऊच्या निमित्ताने जणू तो नवा धडा शिकवतोय. '

फुलाबाई रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून पहारा करत होती. सैतानभाऊही टपून बसला होता.

एक दिवस गेला, दोन दिवस गेले. काहीच घडले नाही. तेव्हा मनावरचा ताण बराच कमी झाला. सैतानचा राग शांत झाला असे समजून लोकांना हायसे वाटले.

गावात एक मूल आजारी असल्याचे कळले, तेव्हा फुलाबाई त्याची उस्तवार करायला रात्री गेली. हगमूत काढण्यापासून ती सगळे करायची. आई एखाद्या वेळी कंटाळेल, पण फुलाबाई कधी कंटाळायची नाही.

रात्री एक माणूस धावऱ्याघुबऱ्या धावत आला. ओरडून सांगायला लागला, ' फुलाबाई घात झाला, घात ! सैतान्यानं घात केला ! तुझ्या बोरीवर कुऱ्हाड चालवतोय. हजार हत्तीचं बळ जणू त्याला चढलंय ! '

फुलाबाई तडक निघाली. पण तिला धड रस्ता दिसेना. जमीन जमीन पायाखालून सरकतीसे वाटू लागले. पाय एकमेकात अडखळू लागले. पडत उठत ती आक्रोश करत जात होती. सारे गाव जमा झाले.

जो तो सैतानाला शिव्या देऊ लागला. त्याची भीती कोणाला आता वाटत नव्हती.

फुलावाईचा आक्रोश ऐकवत नव्हता. लोक तिच्यामागे चालत होते.

सैतानाने झाड तोडून टाकले होते. अंगणभर ते पसरले होते. फुलावाईने टाहो फोडला आणि ती निपचित पडली ! प्राण कुडी सोडून गेला होता. अमृताचे बोर न चाखताच ठाणसिंग आणि फुलावाई गेली. गावाची कीर्ती फडकवून गेली.

फुलावाईच्या भावाने काड्या जमवल्या आणि दिसेल त्या बोरीला तो कलम बांधत सुटला. त्याला कोणीसुद्धा विरोध केला नाही. त्याला जणू तेच एक वेड लागले.

सैतानभाऊने ते दुष्कृत्य करून मेहरूणमधून काळे केले. त्याला नंतर कोणीही कधी पाहिले नाही. फुलावाईचा भाऊ झपाटल्यागत कलमे करत सुटला, पण नंतर तोही कुठे निघून गेला. कोणास कळले नाही. बांधलेली कलमे लोकांनी प्रेमाने सांभाळली.

फुलावाईच्या घराजवळ बोरी होती तिथेच लोकांनी एक समाधी बांधली. फुलावाई आणि ठाणसिंग यांची आणि त्यांच्या लेकीची बदरीची समाधी !

मेहरूणकरांचा नियम आहे. संक्रातीला पहिला वानवळा त्या समाधीपुढे ठेवायचा आणि नंतरच बोरं चाखायची. मेहरूणच्या सगळ्या बोरी एका जातीच्या आहेत.

तोच तपकिरी मखमली पेहेराव, तशीच गुवगुबीत काया. तोच घमघमणारा वास. तीच मिठास आणि तोच स्वाद.

कित्येक वर्षे या घटनेला झाली. मेहरूणची बोरे सर्वत्र ख्याती पावली. आता पूर्वीच्या निष्ठेने वानवळा कोणी वाटत नाही आणि संक्रांतीच्या आधी बोरे चाखायलाही कोणी कमी करत नाही. जमाही

धड करत नाही. मेहेरूणची बोरे सर्वांना माहीत आहेत. पण फुलाबाई-ठाणसिंग यांची गोष्ट फक्त जुन्या लोकांनाच माहीत आहे. एकादा जाणकार म्हातारा भेटला तरच माहीत व्हायची !

※ ※

[illegible] शाखा.
[illegible]
[illegible] २२०५ [illegible] १५-५-८४
[illegible] आ:वा [illegible]

BVBK-0402905